सत्यमेव जयते
पोलीस अधीक्षक,तांत्रिक सेवा, गुन्हे अन्वेषण विभाग, म. राज्य, पुणे
चव्हाणनगर, पाषाण रोड. पुणे – ४११ ००८
दुरध्वनी क्र. ०२० २५६३८४४६ फॅक्स क्र. ०२० २५६३४४५९
संगणक शाखा - ई-मेल - compuer.cid@mahapolice.gov.in

जा.क्र.पोअ/तासे/गुअवि/सीसीटीएनएस/ ई-मेल सुविधा/७१७/२०२५ पुणे दि.०६ / ०८/ २०२५

प्रति,
सर्व पोलीस आयुक्त (लोहमार्गसह), महाराष्ट्र राज्य
सर्व पोलीस अधीक्षक (लोहमार्गसह), महाराष्ट्र राज्य

विषय - ITSSO Portal वरील कमी झालेल्या भारतीय न्याय संहिता कलम ६९ बाबत तसेच बालकांचे लैंगिक अपराधापासून संरक्षण अधिनियम २०१२ मधील वाढवलेले कलम ८ व १० बाबत..

महिला व बालकांचे दाखल होणा-या गुन्ह्यांना नवीन फौजदारी कायद्यामध्ये विशेष महत्व दिले गेले आहे. भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम १९३ (२) मध्ये भारतीय न्याय संहितेतील कलम ६४, ६५, ६६, ६७, ६८, ७० व ७१ तसेच लैगिक गुन्ह्यांपासून बालकांचे संरक्षण कायदा २०१२ मधील कलम ४, ६, ८ व १० मधील गुन्ह्यांमध्ये दोषारोपपत्र/अहवाल हे गुन्हा दाखल झाले पासून २ महिन्यात दाखल करणे अनिवार्य आहे.

त्यास अनुसरून सीसीटीएनएस प्रणालीमध्ये दाखल होणा-या महिला व बाल अत्याचार संदर्भातील भा.द.वि. कलम ३७६ (सर्व उप कलमे) व भारतीय न्याय संहितेतील कलम ६४, ६५, ६६, ६७, ६८, ६९, ७० व ७१ तसेच बालकांचे लैंगिक अपराधापासून संरक्षण अधिनियम २०१२ मधील कलम ४ व ६ मधील गुन्ह्यांचे पर्यवेक्षणाकरिता Investigation Tracking System of Sexual Offences (ITSSO) पोर्टल पर्यवेक्षण अधिकारी यांना उपलब्ध करून देण्यात आले आहे. यामध्ये नव्याने सामाविष्ठ झालेल्या भारतीय न्याय संहितेतील कलम ६९ चाही समावेश एन.सी.आर.बी. नवी दिल्ली यांनी केलेला होता.

वास्तविक पाहता भारतीय न्याय संहितेतील कलम ६९ या गुन्ह्याचे तपासाबाबतची कालमर्यादा भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम १९३ (२) मध्ये नमुद नाही. यामुळे भारतीय न्याय संहितेतील कलम ६९ गुन्ह्याचे तपासातील कालमर्यादेबाबत तथा ITSSO पोर्टल वरील सदर गुन्ह्याचा आढाव्याबाबत घटकांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले होते. त्या अनुषंगाने या कार्यालयाकडून एन.सी.आर.बी. नवी दिल्ली यांना पत्र व्यवहार करणेत आला होता. त्यास अनुसरून एन.सी.आर.बी. नवी दिल्ली यांनी भारतीय न्याय संहितेतील कलम ६९ हे ITSSO चे पोर्टल वरून कमी केले आहे. तसेच सदर ITSSO पोर्टल वर बालकांचे लैंगिक अपराधापासून संरक्षण अधिनियम २०१२ मधील कलम ८ व १० हे नव्याने समाविष्ट करणेत आले आहेत.

एन.सी.आर.बी. नवी दिल्ली यांनी सुधारित ITSSO चे पोर्टलवर भा.द.वि. कलम ३७६ व त्याची (सर्व उप कलमे) तसेच भारतीय न्याय संहितेतील कलम ६४, ६५, ६६. ६७, ६८, ७०, ७१ व लैगिक गुन्ह्यांपासून बालकांचे संरक्षण कायदा २०१२ मधील कलम ४, ६, ८ व १० या कलमांचा उल्लेख ITSSO पोर्टलवर केला असून यापुढे या कलमाबाबतचे गुन्हे हे पोर्टल वर दिसणार आहेत. सदरबाबत ची माहिती एन.सी.आर.बी. नवी दिल्ली यांनी ITSSO पोर्टलचे डॅशबोर्ड वर उपलब्ध करून दिली आहे.

तरी घटक प्रमुखांना विनंती करणेत येते की, त्यांनी ITSSO पोर्टल वरील सुधारित कलमाबाबत आढावा घेऊन आपले अधिनस्त अधिकारी व अंमलदार यांना त्याबाबत अवगत करावे व ITSSO पोर्टल तसेच सीसीटीएनएस प्रणालीचे सुविधेच्या माध्यमातून सदर गुन्ह्यांचे दोषारोपपत्र/अहवाल विहित वेळेत मा. न्यायालयात दाखल होणेकरिता पर्यवेक्षण करावे.

Vaishaali Mane
06/08/25

**(वैशाली माने)**
पोलीस अधीक्षक,तांत्रिक सेवा
गुन्हे अन्वेषण विभाग, म.राज्य,पुणे

प्रत माहिती व कार्यवाहीस्तव,

मा. अपर पोलीस महासंचालक, लोहमार्ग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
मा. सर्व परिक्षेत्रिय विशेष पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य.
मा. विशेष पोलीस महानिरीक्षक, सायबर, महाराष्ट्र राज्य.
मा. पोलीस उप-महानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र, कॅम्प नागपूर.

प्रत सविनय सादर,

मा. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई .
मा. अपर पोलीस महासंचालक का. व सु., महाराष्ट्र राज्य, मुंबई .

प्रत सविनय सादर,

मा. अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, म. रा., पुणे.
मा. विशेष पोलीस महानिरीक्षक, रा.गु.अ.कें.गु.अ.वि.म.राज्य, पुणे.